# प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ ४३२८/२०२४ पुणे दिनांक -१८/०६/२०२४

पुणे रेल्वे स्टेशन येथे येणा-या रहिवाशांच्या सुविधेसाठी तसेच रात्री, अपरात्री येणा-या रेल्वेतुन प्रवास करणा-या महिला व जेष्ठ नागरीकांना सुरक्षा व सुविधा मिळण्याच्या अनुषंगाने प्रीपेड ऑटो रिक्षा थांबा ही संकल्पना राबविण्यात आली होती ती काही कारणास्तव बंद होती ती नव्याने सुरु करणे आहे. दिनांक १८/०६/२०२४ रोजी प्रीपेड ऑटो रिक्षा थांबा योजना राबविण्याचे अनुषंगाने प्रीपेड ऑटो रिक्षा प्रवासी सेवा संस्था पुणे यांची बैठक पार पडली यामध्ये पुणे शहरामध्ये पुणे रेल्वे स्टेशन या ठिकाणी सुरु असलेली प्रीपेड ऑटो रिक्षा थांबा ही योजना पुर्ववत करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार पुणे स्टेशन प्रीपेड ऑटो रिक्षा बुथ प्रायव्हेट तत्वावर सुरु करण्यासाठी प्रस्ताव सादर करणे आहे.

पुणे रेल्वे स्टेशन येथे सदरबाबत रिक्षा संघटना व प्रीपेड ऑटो रिक्षा संघ यांच्या समन्वयाने नमुद प्रायोगिक योजना सुरु करीत आहोत. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए.०१९६/८७१/सीआर-३७/टीआरए - २,दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये वाहतुक शाखा उपायुक्त या अधिकाराचा वापर करुन सदर योजना प्रायोगिक तत्वावरती सुरु करीत आहोत. सदर प्रीपेड ऑटो रिक्षा योजनेचे तांत्रिक व नियोजन करण्याकामी पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा येथे प्रस्ताव मागवित आहोत.तरी सदर योजना प्रायोगिक तत्वावर राबविण्यास उत्सुक असणा-या संघटना, संस्था किंवा कंपनीने आपले प्रस्ताव दिनांक २२/०६/२०२४ पुर्वी सादर करावेत ही विनंती.

( रोहिदास पवार )
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर

**प्रतः- सर्व संबंधीतांना**